भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०७/२०१८

**१) जादुटोना करण्याचे संशयावरून लोखंडी कोयत्याने इसमास गंभीर दुखापत करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद:**

दिनांक २२/०७/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील हे आरोपी व आरोपीतांचे कुंटुबावर जादुटोना करतात असा संशय घेवुन यातील आरोपी याने लोखंडी कोयता घेवन फिर्यादीचे घरी जावुन फिर्यादीचा भाऊ लहु यास डोक्यावर, मानेवर तसेच फिर्यादीस उजव्या डोळयावर कोयत्याने वार करून त्यांना गंभीर दुखाप:त करून त्याची आई पुस्तकला, वडील दर्शन यांना जखमी करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी शिवलाल दर्शन केवट वय २२ वर्ष रा. रोहना यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३०७,४५२ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. कदम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक

**२) महिलेचा विनयभंग करून जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०७/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही कामावर जात असतांना मध्येच येवुन आरोपीने फिर्यादीचा हात पकडुन तिच्या अंगावर हात टाकुन विनयभंग केला व 'मला पैसे दे नाही तर तुझी बदनामी करीन' असे बोलुन शिवीगाळ केली व जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. गोखरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) बोलेरो वाहनाच्या धडकेत पायी जाणा—या इसमास धडक देवुन गभिंर जखमी करून दोन्ही गाडयाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २२/०७/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील बोलेरो गाडी दारूचे नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अनोळखी पायी जाणा—या ईसमास मागेहुन धडक देवुन गंभिर जखमी केले. व रोडचे बाजुला ऊभे असलेला चार चाकी वाहन क्र. एम.एच ३६ एच ३१९२, एमएच ३६ एच ३८२९ हया दोन्ही गाडयांना धडक देवुन दोन्ही गाडीचे नुकसान केल्याने फिर्यादी कपील अनवर खान वय ३२ वर्ष रा. टंडण वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७, भादवी. सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) उपचारादरम्यान ईसमाचा मृत्यु : —**

दिनांक १८/०७/२०१८ चे ०४.३० वाजता दरम्यान यातील मृतक लहु किसन खुड वय ५२ वर्ष रा. परसवाडा याची प्रकृती खराब असल्याने त्यास सा.रू. भंडारा येथे भरती करण्यास आले उपचारा दरम्यान मृत्यु झाल्याने पो.स्टे. भंडारा येथे दिनांक १८/०६/२०१८ चे ११.२३ वाजता मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. प्रमाणे दाखल करण्यात आला. यातील मृतकचे नातेवाईक सामान्य रूग्नालय भंडारा येथील प्रमुख वैदयकीय अधीकारी तसेच पो.स्टे. भंडाराचे पोलीस अधीकारी यांनी पि.एम. न करण्याबाबत लेखी अर्ज केला. त्यामुळे संदर मृतकचे पि.एम. करण्यात आले नाही. सदर मृतकाचे घटनास्थळ परसवाडा येथे सिहोरा येथील असल्याने पो.स्टे. भंडारा येथुन पो.स्टे. सिहोरा येथे टपालाद्वारे जा.क्र. ४२०२/१७ दिनांक २१/०७/२०१८ अन्वये केस पेपेर प्राप्त झाल्याने सदर कागदपत्राची पडताळणी व अवलोकन व सरतर्फे फिर्यादी पो.ना. बारेकर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**५) विहीरीत ऊडी घेवुन ईसमाचा मृत्यु: —**

दिनांक २०/०७/२०१८ चे १०.०० ते दि. २३/०७/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा आजे सासरा मृतक श्रीपत महागु टेकाम वय ७५ वर्ष रा. खडकी याने ग्राम पंचायतच्या सार्वजनिक विहीरीत ऊडी घेवुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी आसाराम सातोबा सराटे वय ३९ वर्ष रा. गराडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. गेडाम पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

६) अवैध हातभट्टी/देशी दारू अड्डयावर धाडी . :–

दिनांक २३/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी,दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन भंडारा व तुमसर येथे अवैध हातभट्टी, देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०९ लिटर हा.भ. दारू कि ९०० /रु. व १ लिटर ८०० मिलीलीटर देशी दारू किमती २,४०० /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २३/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १० ईतर वाहनांवरती – १०८ केसेस करण्यात आले आहे.

(पोउपनी.जे.के.आडोळे)
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.